शासकीय कर्मचारी / अधिकारी यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती प्रकरणी ५ गंभीर आजारांमध्ये सर्व प्रकारच्या कर्करोगांचा समावेश करणे व पाच गंभीर आजारावरील खर्च भागवण्यासाठी रुपये १,००,००० एवढया अग्रीमाची मर्यादा रुपये १,५०,०००/- पर्यंत वाढविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांक एमएजी- २००५/ प्र.क्र.२५१/आ.३
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १० फेब्रुवारी २००६.

वाचा
१) शासन निर्णय सा.आ.वि.क्र.एमएजी-१०८४/४१५-७/सीआर-१५६/ दिनांक २९.४.१९८५
२) शासन निर्णय सा.आ.वि.क्र.एमएजी-१०८८/३८३७/आ.९, दिनां २३.१.१९८९
३) शासन निर्णय सा.आ.वि.क्र.एमएजी-१०९९/प्र.क्र.२३८/आ.३, दि.२१.८.१९९९
४) शासन निर्णय सा.आ.वि.क्र.एमएजी-१०९५/सीआर-४५/आ.३, दि.४.७.२०००
५) शासन निर्णय सा.आ.वि.क्र.एमएजी-१०९५/सीआर-४५/आ.३. दि.४.७.२०००
६) शासन निर्णय सा.आ.वि.क्र.एमएजी-२००५/९/ प्र.क्र.१/ आ.३, दि.१९.३.२००५

**<u>शासन निर्णय :</u>** संदर्भाधिन क्र.४ येथे नमूद करण्यात आलेल्या दिनांक ४.७.२००० च्या शासन निर्णयान्वये खाली नमूद केलेले पाच गंभीर आजार अंतर्भूत आहेत ;

१) हृदय शस्त्रक्रियांची प्रकरणे
२) हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया
३) ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया
४) मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया
५) रक्ताचा कर्करोग

वरील गंभीर आजारांमध्ये अंतर्भूत रक्ताच्या कर्करोगाशिवाय, इतर सर्व प्रकारच्या कर्करोगाचे वाढते प्रमाण, आजारातील गांभीर्य व उपचारावर उद्भवणारा खर्च यासर्व बाबी लक्षात घेऊन, अ.क्रं. ५ येथील "रक्ताचा कर्करोग" या ऐवजी "कर्करोग" असा बदल करण्याची बाब विचाराधीन होती. यास अनुसरुन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत :-

**अ)** प्रस्तुत दिनांक ४.७.२००० च्या शासन निर्णयातील विनिर्दिष्ट ५ गंभीर आजारांच्या यादीतील अ.क्र. ५ येथील "रक्ताचा कर्करोग" या ऐवजी "<u>कर्करोग</u>" अशी सुधारणा करण्यात येत आहे आणि या आजारावर शासकीय अथवा शासनमान्य खाजगी

रुग्णालयातील आंतररुग्ण तसेच बाह्यरुग्ण उपचारांवरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

**ब)** प्रस्तुत दिनांक ४.७.२००० च्या शासन निर्णयान्वयें व उपरोक्त "अ" येथील सुधारणेसह पाच गंभीर आजारांवरील शासकीय अथवा शासनमान्य खाजगी रुग्णालयातील औषधोपचार व आवश्यक उपकरणांची खरेदी करण्यासाठी येणारा संभाव्य खर्च विचारात घेऊन प्रचलित रु.१,००,०००/- अग्रीमाची मर्यादा रुपये १,५०,०००/- ( रु. एक लाख पन्नास हजार फक्त) एवढी वाढविण्यात येत आहे.

**क)** अग्रिम मंजूर करण्याबाबतचे सर्वसाधारण नियम संदर्भाधीन अ.क्र.५ येथील शासन निर्णय दि.४.७.२००० सोबतच्या परिशिष्ट-अ प्रमाणेच राहतील.

३. हे आदेश शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून अंमलात येतील, तथापि या आदेशाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत औषधोपचार घेतलेल्या अनिर्णित प्रकरणांना अथवा आदेशाच्या दिनांकास औषधोपचार सुरु असणा-या प्रकरणांना देखील हे आदेश लागू रहातील. मात्र या आदेशाच्या दिनांकापूर्वी निर्णयीत झालेली प्रकरणे पुन्हा सुरु करण्यात येऊ नयेत.

४. सदर आदेश महाराष्ट्र राज्याचे मंत्री महोदय, महाराष्ट्र विधानमंडळाचे सभापती, उपसभापती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानमंडळाचे विद्यमान व माजी सदस्य, शासकीय कर्मचारी व सर्वांचे कुटुंबिय यांना लागू राहतील.

५. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१३/ सेवा-५, दिनांक १९ जानेवारी, २००६ नुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( र.मो.आडे )
कार्यासन अधिकारी.

प्रति,
मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव, (सर्व) मंत्रालय, मुंबई.
सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई.
*सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
मुख्यमंत्र्यांचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
* प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
*प्रबंधक, मा.लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
*प्रबंधक, मा.उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
राज्यमंत्री (आरोग्य) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक.
मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
विभागीय आयुक्त (सर्व)
सेटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लँड रेकॉर्डस्, पुणे
विभागीय आयुक्त (सर्व) / जिल्हाधिकारी (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), मुंबई /नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
चिफ ऑडिटर, लोकल फंडस् अकाऊंटस्, मुंबई
कोषागार अधिकारी (सर्व)
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
संचालक, आयुर्वेद, मुंबई
संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायो-फार्मास्युटीकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
महासंचालक, माहिती व जनसंपर्क मंत्रालय, मुंबई
सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, (सर्व)
* प्राथोनोटरी व सिनियर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
वित्त विभाग (कार्यासन सेवा-५), मंत्रालय, मुंबई
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.
वित्त विभाग (सेवा-५ कार्यासन), मंत्रालय, मुंबई ( १० प्रती)
सर्व कार्यासन अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन), मंत्रालय, मुंबई.

२. मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना कार्यासनास विनंती करण्यात येते की, त्यांनी शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या सर्व संबंधित कार्यासनाना पाठवाव्यात. तसेच संबंधित कार्यासनांने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना पाठवाव्यात.

निवडनस्ती (आरोग्य-३), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
(* - पत्राद्वारे)

------